HVLI
602-1/13
1973

।। श्रीगजानन प्रसन्न ।।

खरेदीपत्र शके १८९४ मिती फाल्गुन वद्य ७ रोज सोमवार तारीख २६ माहे मार्च सन १९७३ इसवी ते दिवशीं ।-

लिहून घेणार :-

''पुणा विमेन्स कौन्सिल, पुणे'' या संस्थेचे विश्वस्त ट्रस्टी :-

१. सौ. शिरिनबाई ... फडके, धर्म हिंदू, वय वर्षे ६५ सुमारे, धंदा गृहकाम, रा. घर नं. १०१४ सदाशिव पेठ, पुणे - ३०.

लिहून देणार :-

श्री. लक्ष्मण गणेश देशपांडे, धर्म हिंदू, वय वर्षे ६५ सुमारे, धंदा गृहकाम, रा. घर नं. २१२-अ/२ शुक्रवार पेठ, पुणे २.

खरेदीखत त्यावर मिळकतीचे म्हणजे फक्त इमारतीचे (स्टँडिंग स्ट्रक्चरचे) किंमत रुपये ३६,०००/- छत्तीस हजार चे.

---

कारणें खरेदीखत लिहून देतो कीं :-

(१) मिळकतीचे वर्णन :- तुकडी पुणे पोट तुकडी तालुका हवेली सब-रजिस्ट्रार यांचे हद्दीतील, शहर पुणे पेठ सदाशिव येथील, जुना सिटी सर्व्हे नं. ५०५/४ याचा हल्लीचा नवीन सि.स.नं. १३४७-अ ची मिळकत. या मिळकतीची भुई जागा सोडून त्यावर हल्ली असलेली इमारत (म्हणजे स्टॅण्डिंग स्ट्रक्चर फक्त) या - खरेदीखताने आम्ही तुमचे संस्थेस विकत दिलेली आहे. त्याचा तपशील :- सदर मिळकतीत जुन्या टाईप पध्दतीची दगडी बांधणीची एक मजली इमारत असून त्यात निरनिराळ्या क्लास रुम्स आहेत व सभोवताली व्हरांडा आहे. अशी दगडी बांधणीची हल्ली जागेवर असलेली सर्व इमारत त्या खालील जागा सोडून, या इमारतीची मोजणी उत्तर बाजू पूर्व-पश्चिम फूट ६१ व पूर्वेकडून दक्षिणेकडे ३१ फूट त्यानंतर पूर्वेकडून पश्चिमेकडे २२ फूट, पश्चिम टोकापासून दक्षिणेकडे सरळ रेषेत जाऊन पूर्व-पश्चिम दक्षिण बाजू ३९ फूट व दक्षिणोत्तर पश्चिम बाजू ४९ फूट ९ इंच सुमारे, याप्रमाणें मोजणीची इमारत. याप्रमाणें क्षेत्रफळ - ६०९.
२२५.३४ चौरस मीटर्स सुमारे. यांसी चतुःसिमा :- पूर्वेस, दक्षिणेस, पश्चिमेस व उत्तरेस :- या चारही बाजूस याच सि.स.नं. १३४७/ब पैकीं मोकळी जागा आमचे

INDIA NON JUDICIAL

७५० रु. Rs 750

सात सौ पचास रूपया SEVEN HUNDRED & FIFTY RUPEES

महाराष्ट्र

No. 4566 ... OFFICE Sub-Reg. Office dated 21-3-73

General Stamp / Court fee Stamp of Rs. 750 x 2 + 500 x 1 + 100 x 1 + 60 x 1 = 2160 |-

Issued to Sau Indira Anant Phadake

through L. P. Bhat-

1728 Sadashiv Poona-30

S. S. Chavan.

S. T. O. Stamp Head K...

HVLI

602-3/13

1973



मालकीची असून ती आमचे भाडेकरी (लेसी) म्हणून तुमचे संस्थेच्या कबजेवहिवाटीस आहे. याप्रमाणें सि.स.नं.१२४७-ब या मिळकतीत असलेली विद्यमान अिमारत तदंगभूत वस्तुसहित व सर्व हक्कासुध्दां. सदर मिळकतीची सबंध मोकळी जागा (भुअी जागा) ही आमच्या पूर्ण मालकी वहिवाटीची असून आमचे भाडेकरी (लेसी) म्हणून तुमच्या संस्थेच्या ताब्यात भाड्यानें आहे व ती भुअी जागा तुमच्या संस्थेस विकत दिलेली नाहीं.

(२) वर कलम १ यात वर्णन केलेली मिळकत आमचे मालकी वहिवाटीची आहे. सदर मिळकतीपैकीं मोकळी खुली जागा आम्ही तुमच्या संस्थेस ता. १०-२-६१ च्या

रजिस्टर्ड भाडेचिठ्ठीअन्वयें भाड्यानें दिलेली आहे व त्या भाडेचिठ्ठीअन्वयें सदरची खुली जागा तुमच्या संस्थेच्या ताब्यात भाड्यानें आहे. तुमच्या संस्थेनें आमच्या नांवे लिहून दिलेली ता. १७-२-६२ ची भाडेचिठ्ठी मे.जॉ.स.र.हवेली नं. १ यांचे कचेरीत १ ले नं. चे बुकांत ४१२ नंबरी ता. १७-२-६२ रोजी नोंदली आहे व त्या भाडेचिठ्ठीप्रमाणें भाडेचिठ्ठीतील शर्तीनुसार आमचे लेसी या नात्यानें तुमची संस्था सदर मिळकतीची भाड्यानें वहिवाट करीत आहे. अशा रीतीनें वर नमूद केलेली मिळकत आमचे अेकट्याच्या स्वकष्टार्जित स्वतंत्र व पूर्ण मालकी वहिवाटीची असून आमचे अेकट्याखेरीज सदर मिळकतीत अितर कोणाचा कोणत्याहि प्रकारचा हक्क, दावा, हितसंबंध अगर मालकी वहिवाट वगैरे नाहीं. सदर मिळकतीची आमचे मर्जीप्रमाणें व्यवस्था व विल्हेवाट करण्याचा आम्हांस पूर्ण हक्क व अधिकार असून सिटी सर्व्हे व म्युनिसिपल कॉर्पो.कडे सदर मिळकत आमचेच नांवे दाखल आहे.

(२) वर कलम २ यात नमूद केल्याप्रमाणें आम्ही तुमच्या संस्थेस सदरील सि.स. नं. १२०७-अ या मिळकतीची खुली जागा ज्यावेळी भाड्यानें दिली, त्यावेळी त्यात असलेली अिमारत जिचे तपशीलवार वर्णन वर कलम १ यात दिले आहे ती अिमारत आम्ही तुमचे संस्थेस भाड्यानें दिली नव्हती व नाहीं. ती अिमारत आम्ही - आमचेकडे तशीच मालकी हक्कानें ठेविली होती. सदरची सर्व अिमारत आम्ही आमचे स्वसंपादित रकमेतून नवीन बांधलेली होती व आहे. वर लिहिल्याप्रमाणें ता. १७-२-६२ च्या भाडेचिठ्ठीच्या वेळी सदर मिळकतीमधील फक्त खुली जागा तुमच्या संस्थेस भाड्यानें देऊन त्यावरील अिमारत आम्ही आमचेकडे मालकी हक्कानें तशीच ठेविली. परंतु तुमच्या संस्थेच्या शाळेच्या कार्यासाठी सदरील मिळकती-मधील वर वर्णन केलेल्या अिमारतीची तुमच्या संस्थेस जरूरी असल्यानें व ती - तुमच्या संस्थेच्या दृष्टीनें सोयीस्कर अशी असल्यानें वर कलम १ यात वर्णन केलेली

INDIA NON JUDICIAL

५०० रु.　　Rs.500

भारत

पाँच सौ रुपया FIVE HUNDRED RUPEES

महाराष्ट्र

No. 4955 ........ ~~Sub-Try. Office~~ dated 21-3-73

General Stamp
~~Court fee Stamp~~ of Rs. 750 x 2 + 500 x 1 + 10 x 1 + 60 x 1 = 2150

Issued to Sau. Indira Anand Phadake

self/through L. A. Bhat

1228 Sadashiv Peth Pune. 30.

S. Chavan.

S. T. O./Stamp Head [illegible]

HVLI
602-5/13
1973

- ५ -

अिमारत (स्टॅण्डिंग स्ट्रक्चर) तुमच्या संस्थेनें आमचेकडे अुक्ती किंमत रु. ३६०००/- छत्तीस हजार यास सन १९६२ मध्यें विकत मागितली. तुमच्या संस्थेनें सन १९६२ साली देअू केलेली ही किंमत त्यावेळच्या बाजारभावास धरुन योग्य व वाजवी असल्यानें व ती आम्हांस मान्य झाल्यानें वर कलम १ यात वर्णन केलेली मिळकत म्हणजे सि.स.नं. १२४७-ब सदाशिव पेठ या मिळकतीमधील शाळेची सर्व अिमारत आम्ही तुमच्या संस्थेस अुक्ती किंमत रु. ३६,००० छत्तीस हजार यास निर्वेध व कायम खुष खरेदी देण्याचे कबूल करुन त्याबद्दलचे खरेदीचे साठेखत तुमच्या संस्थेच्या नांवे ता. १६-२-१९६२ नोंद ता. १७-३-६२ रोजी लिहून देअून त्यात नमूद केल्याप्रमाणें खरेदी किंमतीपैकीं रु. २५,००० पंचवीस हजार आम्हांस तुमच्या

संस्थेकडून पावलेले आहेत. खरेदी किंमतीचे बाकीचे रु. 11,000 अकरा हजार आम्हांस देण्यासाठी तुमच्या संस्थेने साठेखताच्या वेळी 10 दहा वर्षांची मुदत आमचेकडे मागितली. व तुमच्या संस्थेची अडचण व केवळ शिक्षणावरील आमचे प्रेम व श्रद्धा ध्यानात घेऊन आम्ही सदरची रक्कम रु. 11000 अकरा हजार आम्हांस देण्यासाठी आम्ही 10 दहा वर्षांची मुदत मान्य केली. आम्ही तुमचे संस्थेस लिहून दिलेले ता. १६-२-१९६२ चे खरेदीचे साठेखत मे.सॅा.स.र.हवेली नं. १ यांचे कचेरीत ४१४-अ नंबरी ता. १७ मार्च १९६२ रोजी नोंदले आहे, व त्या साठेखताच्या वेळीच साठेखतात नमूद केल्याप्रमाणे सदरील मिळकतीचा ताबा - पार्ट परफॉर्मन्स म्हणून तुमच्या संस्थेस आम्ही दिलेला आहे, व तेंव्हांपासून खरेदी दिलेली सदरची मिळकत म्हणजे ईमारत तुमच्या संस्थेच्या प्रत्यक्ष ताब्यात आहे. व सदर मिळकतीचे म्युनिसिपल कॉर्पोरेशनचे टॅक्सेस वगैरे तुमची संस्थाच आतापावेतो भरत आलेली आहे.

(४) वर कलम २ यात उल्लेखिल्याप्रमाणे ता. १६-२-६२ च्या साठेखताच्या - वेळी साठेखतात नमूद केल्याप्रमाणे तुमच्या संस्थेकडून खरेदी किंमतीपैकी आम्हांस रु.२५००० पंचवीस हजार पावलेले आहेत. राहिलेल्या रु. ११००० अकरा - हजारापैकी रु. ७००० सात हजार हे तुमच्या संस्थेकडून ता. १-४-१९६२ रोजी आम्हांस रोख मिळालेले आहेत व बाकीचे उरलेले सर्व रुपये ४००० चार हजार हे तारीख १-४-१९६६ रोजीच तुमच्या संस्थेकडून आम्हांस पावलेले आहेत व याप्रमाणे तुमच्या संस्थेकडून आम्हांस दोन वेळेस पावलेले रु. ११००० अकरा हजार हे ता. १६-२-१९६२ च्या साठेखतावर आम्ही मांडून दिले आहेत. अशा रितीने सदरील मिळकतीच्या खरेदी भरण्याची एकूण सर्व रकम रु. ३६००० छत्तीस हजार आम्हांस तुमच्या संस्थेकडून ता. १-४-६६ अखेर पावेतो पुरती पावलेली असून त्याप्रमाणे फक्त खरेदीखताचा दस्तऐवज तुमच्या संस्थेच्या नांवे करून -

१०० रु. Rs 100

एकशे रुपये ONE HUNDRED RUPEES

महाराष्ट्र

Stamp of Rs. [illegible]
Court Fee Stamp
Issued to [illegible]
self/through [illegible]

S. S. & Stamp Road Kaskeen

RVLI
602-7/13
1983

- ७ -

देण्याचे ठरविले होते व ती खरेदीचा दस्तऐवज तुमची संस्था आमचेकडून लिहून मागेल त्यावेळी आम्ही लिहून द्यावयाचा ठराव तुमच्या संस्थेच्या व आमच्या दरम्यान झालेला होता व आहे. त्या ठरावास अनुसरून वर कलम १ मधील - इमारतीचे खरेदीखत तुमच्या संस्थेने आमचेकडे करून मागितल्यावरून त्याप्रमाणे प्रस्तुतचे खरेदीखत आम्ही आज रोजी तुमच्या संस्थेच्या नांवे लिहून देऊन तुमची संस्था व आम्ही यांचे दरम्यान ता. १८-१-१९८२ ( नोंद ता. १७-१-८२) रोजी झालेल्या रजिस्टर्ड साठेखताप्रमाणे ठरलेला खरेदी व्यवहार आज रोजी आम्ही पुरा करून दिला आहे.

(४) वर कलम १ मध्ये वर्णन केलेली मिळकत म्हणजे सि.स.नं. १२७०-अ या -

मिळकतीत असलेले सर्व स्टॅण्डिंग स्ट्रक्चर आम्ही तुमच्या संस्थेस ता. १६-२-६२ च्या साठेखतामधील अटींनुसार कुली किंमत रु. ३६००० छत्तीस हजार यांस निर्वेध व कायम कुल खरेदी दिले आहे. खरेदी दिलेली सदरची स्टॅण्डिंग स्ट्रक्चरची सर्व मिळकत ता. १६-२-६२ च्या साठेखतात नमूद केल्याप्रमाणें तुमच्या संस्थेच्या प्रत्यक्ष ताब्यात आहे तो तुमच्या संस्थेचा असलेला ताबा या खरेदीच्या दस्तानें तुमच्या संस्थेच्या पूर्ण मालकी हक्कास कायम केला असून खरेदी दिलेल्या सदरील अिमारती-वरील आम्ही आमचा कबजा व मालकी हक्क सर्वस्वी सोडून दिलेला आहे. या खरेदीखतान्वयें तुमच्या संस्थेस १२४७-ब सदाशिव पेठ पुणें या मिळकतीमधील फक्त स्टॅण्डिंग स्ट्रक्चर म्हणजे अिमारत विकत दिलेली आहे व १२४७-ब सदाशिव पेठ या मिळकतीची सर्व भुअी जागा आम्ही आमचेकडेच पूर्ववत मालकी हक्कानें तशीच कायम ठेविली आहे. व ती भुअी जागा ता. १७-२-६२ च्या रजिस्टर्ड भाडे-चिठ्ठीप्रमाणें तुमच्या संस्थेनें आमचे लेसी म्हणून तशीच भाड्यानें वहिवाटण्याची आहे. ता. १७-२-६२ च्या रजिस्टर्ड भाडेचिठ्ठीप्रमाणें तुमची संस्था ही आमची लेसी व आम्ही तुमच्या संस्थेचे लेसॉर म्हणून सदर मिळकतीबाबतचे आपले -अेकमेकांचे जे कांहीं हक्क हितसंबंध आहेत ते तसेच कायम ठेविण्यात आलेले आहेत. त्याबाबतच्या आपल्या अेकमेकांच्या हक्कास या दस्तअैवजानें कोणताहि बाध आलेला नाहीं व येत नाहीं, अगर येणार नाहीं.

(६) यापुढें तुमच्या संस्थेस विकत दिलेल्या सदरील अिमारतीच्या मिळकतीवर आमचा व आमचे वालीवारस वगैरे कोणाचाहि कोणत्याहि प्रकारचा हक्क, दावा, हितसंबंध अगर मालकी राहिली नसून तुमची संस्था ही सदरील स्टॅण्डिंग स्ट्रक्चर या मिळकतीची पूर्ण मालक झाली आहे. व भुअी जागा पूर्ववत आमचेकडे मालकी हक्कानें राहिलेली आहे. तुमची संस्था व आम्ही यांच्या दरम्यान झालेल्या

No. 4966 STAMP OFFICE dated 21-3-73
Sub-Try. Office

General Stamp
Court fee Stamp of Rs. 250×2 + 500×1 + 100×1 + 60×1 = 21
Issued to Shri Madhav Anant Bhedale
self/through A. Bhat
1328 Sadashiv Peth Poona-30

Jadhav.
S. T. O. Stamp Road Karkun,
Poona

HVLI
602-9/13
1973

- ९ -

ता. १७-२-६२ च्या रजिस्टर्ड भाडेचिठ्ठीप्रमाणें तुमच्या संस्थेनें सदर मिळकतीच्या मुओजागेचे भाडे आम्हांस देत जाऊन कायम ! गालील मिळकतीची म्हणजे खरेदी दिलेल्या फक्त निम्म्याच्या मिळकतीची पूर्ण मालकी हक्कानें वहिवाट करावी. त्यास कोणासहि हरकत घेऊन तक्रार अगर वाद अुपस्थित करण्याचा हक्क व अधिकार नाहीं. तथापि सदर खरेदी दिलेल्या मिळकतीच्या तुमच्या संस्थेच्या मालकी वहिवाटीस व अुपभोगास आमचे वतीनें कोणाचीहि कोणत्याहि प्रकारें हरकत तक्रार आल्यास त्याचे निवारण आम्ही आमच्या खर्चानें करूं व अशा हरकतीमुळें तुमच्या संस्थेस तोषीस लागून तुमच्या संस्थेचे कोणत्याहि प्रकारें नुकसान झाल्यास ते आम्ही भरून देऊं. तक्रार करणार नाहीं.

(७) सदर मिळकतीचे म्युनि.कॉर्पो. चे टॅक्सेस वर नमूद केल्याप्रमाणें आतापावेतो

तुमची संस्थाच भरीत आलेली आहे. त्याप्रमाणें यापुढेही सदर मिळकतीचे म्युनि. कॉर्पो. चे टॅक्सेस तुमच्या संस्थेनें भरीत जावेत. तसेच सदर खरेदीखताची रजिस्टर नोंद प्रॉ.र. उता-यावर होण्यासाठी आमच्या सही संमतीची गरज लागल्यास आम्ही तशी सही संमती अगर जाबजबाब देऊं.

(८) तुमच्या संस्थेच्या भोगवट्यास सदर मिळकतीचा प्रॉ.र. चा उतारा दिला आहे. याखेरीज सदर मिळकतीचे सर्व टायटल डीड्स आम्ही तुमच्या संस्थेस पूर्वीच दाखविले असून सदर मिळकतीच्या आमच्या मालकी हक्काविषयी व मार्केटेबल टायटल बद्दल तुमच्या संस्थेनें संपूर्णपणें खात्री करून घेतली आहे. तुमच्या संस्थेस फक्त स्टॅण्डिंग स्ट्रक्चर विकले असून मुळी जागा आम्ही आमचेकडे मालकी हक्कानें ठेविली असल्या कारणानें सदर मिळकतीचे सर्व टायटल डीड्स आम्ही आमचेकडेच ठेविले आहेत. तथापि तुमच्या संस्थेस सदर मिळकतीच्या आमचेजवळ असलेल्या कोणत्याहि टायटल डीड ची जरूरी लागल्यास ते कागद दाखविण्याची आम्ही व्यवस्था करूं.

(९) या खरेदीखताच्या भरण्याची सर्व रक्कम रु. ३६,००० छत्तीस हजार वर उल्लेखिल्याप्रमाणें आम्हांस तुमच्या संस्थेकडून यापूर्वीच वेळोवेळी पावलेली आहे. त्याबाबत आमचे तुमच्या संस्थेकडे कांहींएक येणे राहिले नसून निराळ्या भरणे-पावतीची जरूरी नाहीं. या खरेदीखताचा संपूर्ण भरणा आम्हांस पावलेला असून त्याबाबत आमची तक्रार नाहीं.

(१०) आम्ही तुमच्या संस्थेस ता. १६-१-६२ रोजी लिहून दिलेल्या रजिस्टर्ड साठेखताच्या कलम १ मध्यें नमूद केल्याप्रमाणें सदर मिळकतीवर श्री. पाळंदे यांचा जो नजरगहाणाचा बोजा होता त्याची व शिवाय (१) श्रीमती सुमति शिवराम बहुलुले व (२) श्रीमती सुलभा गणेश बापट यांच्या अिक्विटेबल मॉर्गेजच्या बोजाची

दोन्ही बोजांची संपूर्ण फेड आम्ही पूर्वीच केलेली असून त्याबाबत आता त्यांचे कांहींएक देणें राहिले नाहीं. सदरची मिळकत सदरील दोन्ही गहाण बोजातून पूर्वीच रुणमुक्त (रिलीज) झालेली आहे. या शिवाय सदरची मिळकत आम्ही इतर कोणास गहाण, दान, बक्षिस, खरेदी वगैरे दिली नव्हती व नाहीं, व मिळकत अन्य कोणत्याहि जडजोखमीत लेखी अगर तोंडी करारानें गुंतविलेली नाहीं. हल्ली सदरची संपूर्ण मिळकत निर्बंध, निष्कर्जी व निर्विवाद अशी असून ती वर लिहिल्याप्रमाणें आम्ही तुमच्या संस्थेस जुकती किंमत रु. ३६,००० छत्तीस हजार यास कायम खुष खरेदी दिली आहे. उलट करार अगर परत घेण्याची लेखी अथवा तोंडी बोली नाहीं.

(११) सदरील मिळकत म्हणजे स्टॅण्डिंग स्ट्रक्चर आमचेकडून विकत घेण्याचा व त्याबाबतचे जरूर ते दस्त आमचेकडून करून घेण्याचा रीतसर ठराव तुमच्या संस्थेच्या कार्यकारी मंडळानें पूर्वीच पास केला आहे व त्या ठरावानुसार सदर खरेदीचा दस्तऐवज आम्ही तुमचे नांवे पुरा करून दिला आहे.

(१२) तुमची संस्था ही चॅरिटी कमिशनर पुणे यांजकडे रजिस्टर झालेली आहे. व नियमाप्रमाणें सदरची मिळकत आमचेकडून विकत घेण्यास मे. चॅरिटी कमिशनर, पुणें यांनी परवानगी दिली आहे.

(१३) ट्रान्सफर ऑफ प्रॉपर्टी ॲक्टान्वयें तुमच्या संस्थेस प्राप्त होणारे सर्व हक्क व अधिकार शाबूत आहेत व राहातील.

(१४) या खरेदीखताचा स्टॅम्प, नोंदणी फी, टायपिंग, मसुदा फी, इत्यादि खर्च तुमच्या संस्थेनें अलाहिदा केला आहे.

हें खरेदीखत आम्ही आमच्या राजीखुषीनें लिहून दिले असून ते आमचेवर

व आमचे वालीवारस, आसामीन, अेक्झिक्यूटर्स वगैरे सर्वांवर तसेच तुमची संस्था व तुमच्या संस्थेचे विद्यमान ट्रस्टीज व विद्यमान ट्रस्टींच्या जागी येणारे नवीन ट्रस्टीज वगैरे सर्व पदाधिकारी यांचेवर बंधनकारक आहे व राहील. तारीख - मजकूर.

साक्षी :-

सह्या -

X इंदिराबाई गणेश देशपांडे

१.सही- C.S.Gore

पत्ता:- 186 Rasta Peth Poona-11

( लिहून देणार )

२.सही- [signature]

श्री. इंदिराबाई अनंत फडके

''सुलभ शिक्षण मंडळ, पुणे''
या संस्थेचे विद्यमान ट्रस्टी

पत्ता:- 1273 Sadashiv Poona No 30

( लिहून घेणार )

THE SEAL OF THE SU[B REGISTRAR] HAVELI

६०२-१३/१३

1973

(१) लक्ष्मणगोविंदरापांडे

(2) पुणेशिक्षणमंडळ पुणे या संस्थेतें विद्यमान ट्रस्टी - भिदेराबाईअनंत फडके

रामचंद्र सखाराम दि(?) पोर सदर, पुणे ११११/७३ बुधवार

खुलवण्यू ६५/६५

१ दुय्यम निबंधक यांच्या समोर बांचे प्रमुख ... कबुल करून सांगितले ... असल्याचे ... व त्यांची ओळख ... पटवली.

नं. १ २३२-अ२ शुक्रवारपेठ व नं. २ १७०२८ सदाशिवपेठ, पुणे

यांनी ... स्वतः ...

... कबुल करून लिहून दिल्याचे कबूल करतात.

तारीख २६ माहे मार्च सन १९७३

दुय्यम निबंधक, पुणे नं. १, पुणे.

लक्ष्मण अनंत देसाई

कृ. शिंदेराबाई अनंत फडके

पोहोचलेल्या पुस्तकाच्या ... बाहेर ...

६०२

दुय्यम निबंधक

तारीख २६ माहे मार्च सन १९७३

THE SEAL OF THE SUB-REGISTRAR